# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 08/08/2023 (मंगळवार) दुपार


### घरफोडी

**पो.स्टे. कळमेश्वर** :— अंतर्गत मौजा निमजी शिवार येथे दिनांक ०७/०८/२०२३ चे ०१.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— निलेश चिंतामण नेवारे, वय ३५ वर्ष, रा. निमजी हा मनोहर भांडारकर रा. नागपुर यांचे शेतावर ०८ वर्षा पासुन नोकर म्हणुन निमजी येथील शेतीवर काम करतो. त्याच शेतात एक स्टोअर रूम असुन दिनांक ०६/०८/२०२३ रोजी रात्री १०/३० वा. सुमारास फिर्यादी हा जेवन करून मौजा निमजी येथील शिवारात परीवारासह झोपला असता अंदाजे रात्री १/३० वा. दरम्यान कुत्रा भुंकण्याचा आवाज आल्याने फिर्यादीने उठुन पाहीले असता स्टोअर रूम जवळ तिन इसम अज्ञात सामान घेवुन जातांनी दिसले. स्टोअर रूम जवळ जावुन पाहीले असता स्टोअर रूमचे लॉक कापलेले दिसले आत मध्ये जावुन पाहीले असता दोन जुन्या मोटारी किंमती अंदाजे ३०००/— रू तसेच एक जुना लोखंडी झुला अंदाजे किंमती ५०००/—रू व २०० फुट केबल अंदाजे किंमती २०००/— रू असा एकुण १०,०००/— रू चा मुद्देमाल ठेवलेला तिन अज्ञात इसमांनी चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८०, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार किशोर लोही ब. नं. १९४४ हे करीत आहे.

### जबरी संभोग

**पो.स्टे. कळमेश्वर** :— दिनांक ०६/०८/२०२३ चे ०८.०० वा. ते २२.०० वा. सुमारास फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय २ वर्ष ९ महीने ही शेजारी राहणारा विधीसंघर्ष बालक यांचे घरी खेळण्यास गेली असतांना घरी कोणी हजर नसल्याची संधी पाहुन तिच्या अल्पवयाचा अज्ञानतेचा फायदा घेवुन तिचेवर जबरी संभोग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे विधीसंघर्ष बालक यांचेविरूद्ध कलम ३७६(२)(जे), ३७६ (एबी) भांदवि. सहकलम ४, ५ (एम) ६ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक गेडाम मॅडम मो. क्र. ९५०३९७३६५७ या करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर